**वि.दि.मु.नं.४५३/२०२३(नि.३७ लगत)**

**उलटतपास शपथेवर सुरु**
**उलटतपास प्रतिवादीतर्फे ॲड. आय. डी. खान यांचेतर्फे सुरू**

१. पुणे येथे माझा शेती व जमीन विकसीत करण्याचा व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे नाही की मी स्वत: शेती करीत नाही. मी खंडाळा येथे शेती करतो. माझ्या शेताचे गट नं.४५ व ४६ आहे. हे म्हणणे खरे नाही की मी स्वत: शेती करीत नसुन मजुरांकडुन शेती करुन घेतो. हे म्हणणे खरे नाही की माझा सावकारीचा व्यवसाय आहे.

प्रश्न - तुम्ही कोठे कोठे जमिनीचे व्यवहार केलेले आहेत ?

उत्तर - मी विकसक असल्यामुळे एकच व्यवहार केलेला नाही, अनेक व्यवहार केलेले आहेत.

२. खंडाळा कोर्टासमोर आमचा एक व्यवहार चालु असताना प्रतिवादी जाधव त्याठिकाणी आले व त्यांची जमीन घेण्याबाबत मला विचारले. त्याठिकाणी आमची ओळख झाली. हे मला आता सांगता येणार नाही की त्यादिवशी माझा कोणता व्यवहार चालु होता.

प्रतिवादींना सरतपासाची प्रत मिळालेली नसल्याने वकिलांचे तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई.
दिनांक : २७.०७.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, वाई.